नाव : तुळशीराम शामराव दोरतले,

वय : 33 वर्ष, कामधंदा : पोस्टल ॲसिस्टंट, देवगाव रंगारी, ता. कन्नड, छ. संभाजीनगर सब पोस्ट ऑफीस

राहणार : चोपडयाची वाडी, पोस्ट रामपुरी, ता. गेवराई जि. बीड.

शपथेवर कथन करतो की,

**अर्जदार यांच्या साक्षीदाराचा सरतपास : अर्जदारातर्फे श्री. अविनाश काटकर वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरू :**

1. आमच्या कार्यालयाला न्यायालयाचे समन्स प्राप्त झालेले आहे. मला आमच्या कार्यालयाने साक्ष देण्यासाठी अधिकार दिलेले आहेत त्यांचे पत्र सादर केलेले आहे ते **नि. सी–16** सोबत दाखल केलेले आहे. त्यास **नि. सी–17** देण्यात येत आहे. देवगाव रंगारी या सब ऑफीसच्या अंतर्गत 10 शाखा पोस्ट आहेत. लामणगाव हे देवगाव रंगारी या सब ऑफीसच्या अंतर्गत येते. लामणगावच्या पोस्टाच्या शाखेअंतर्गत भोकरगाव ता. वैजापुर हे येते. भोकनगाव हे देवगाव रंगारी या पोस्टाचे कार्यालयाच्या कक्षेत येत नाही. साक्षीदारास अर्ज डब्ल्यूसीए सी 24/2017 मधील नि. यु–8 वरील यु–8/1 वरील ट्रॅक रिपोर्ट क्र. आरएम 357354627 IN हे दाखवण्यात आले. सदर कंसाईनमेंट देवगाव रंगारी या ऑफीसला गेलेले होते व ते देवगाव रंगारी अंतर्गत डिलीवर करण्यात आलेले आहे. साक्षीदारास नि. ओ–1 वरील क्र. आरएम 357354627 IN ची रजिस्टर पावती दाखवण्यात आली. सदर पावती प्रमाणे क्र. आरएम 357354627 IN हे पत्र भोकरदन गावाकरिता पाठवण्यासाठी रजिस्टर केलेले आहे. नि. यु–8/1 वरील ट्रॅक रिपोर्टप्रमाणे नि. ओ–1 वरील क्र. आरएम 357354627 IN करिता रजिस्टर केलेले आहे.

सरतपास : संपला.

**<u>अर्जदार यांच्या साक्षीदाराचा उलटतपास : सामनेवालातर्फे श्री. डी. डी. निकम वकील यांचा पुकारा केला असता गैरहजर. साक्षीदाराचा उलटतपास केला नाही. सबब, उलटतपास काही नाही.</u>**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

Digitally signed by DATTATRAY SHANKARRAO KHEDEKAR
Date: 2025.12.18 10:53:44 +0530

**(द.शं.खेडेकर)**

दिनांक–17/12/2025

श्रमिक नुकसान भरपाई आयुक्त व न्यायाधीश,
कामगार न्यायालय क. 1 औरंगाबाद